ISBN-978-81-970623-5-3

# राजकीय मानसशास्त्र- उदय व सद्यस्थिती

**डॉ. करीम मुल्ला[1], डॉ. विवेक कोतेकर[2]**

*सहायक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर*

*सहायक प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग, राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर*

**प्रस्तावना:**

मानसशास्त्र हे मानवी वर्तनाच्या विविधांगांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. मानसशास्त्राने आज मानवी वर्तनाला व्यापले आहे. अनेक मानसशास्त्रज्ञ मानवी वर्तनाचा व त्याच्या परिणामांचा अभ्यास करण्यात व्यस्त असून, त्यांनी विविध आश्चर्यकारक गोष्टींचा शोध लावलेला आहे. मानव अमुक अमुक वर्तन का करतो? तो तसेच वर्तन का करतो? या वर्तनामागची कारणमीमांसा काय आहे हे शोधण्यात अनेक मानसशास्त्रज्ञांनी आपले जीवन व्यतित केले आहे. विल्यम जेम्स, सिग्मंड फ्राईड, इव्हान पॅव्लॉव्ह, बी.एफ.स्किनर, वदीयमर, फ्रँकल, एलिस, लेविन, फोर्टरंजर अशा अनेक मानसशास्त्रांनी वैयक्तिक व सामाजिक व्यवहाराच्या वर्तमाना सखोल अभ्यास केला आहे, यातून अनेक शाखांची निर्मिती झाली. सकारात्मक मानसशास्त्र, अपसामान्य मानसशास्त्र, समुपदेशन मानसशास्त्र, औद्योगिक मानसशास्त्र असा अनेक शाखा कालपरत्वे उदयास आल्या.

यामध्ये एक विषय सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळयाचा आहे तो म्हणजे, राजकारण. प्रत्येक व्यक्तीला राजकारणाची थोडी का होईना ओढ असतेच. चारचौघांच्या चर्चांचा अनेकदा विषय राजकारण हाच असतो. राजकारण, राजकीय व्यवस्था हा सर्वसामान्यांच्या चालण्या-बोलण्यातील एक जवळीकतेचा विषय आहे. अबालवृध्दांपासून अनेकांना राजकारणाचं व राजकारण्यांचं अप्रुप वाटत आलेलं आहे. हे राजकारण चालतं कसं, राजकारण समाजावर कसं प्रभाव पाडतं, लोकांच्या मनाचा ठाव कसं घेतं हा शास्त्रज्ञांच्याही आकर्षणाचा विषय ठरला आहे. यातूनच उदय झाला राजकीय मानसशास्त्राचा.

राजकीय मानसशास्त्र ही मानसशास्त्राची अशी शाखा आहे ज्यामध्ये राजकारण, राजकारणी आणि राजकीय वर्तनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. तसेच यामध्ये सामाजिक व राजकीय दृष्टीकोणांचासुध्दा मानसशास्त्रीय अंगाने अभ्यास करतात. हा अभ्यास करत असताना राजकीय मानसशास्त्राने विविध शाखांचा जसा की मानववंशशास्त्र, पत्रकारिता, माध्यमं, समाजशास्त्र, राज्यशास्त्रा आदि. आधार घेतलेला दिसतो.

राजकीय मानसशास्त्र ज्या उद्दिष्टांनी प्रेरित आहे. त्यामध्ये व्यक्ती आणि परिस्थिती यामधील आंतंक्रिया

ISBN-978-81-970623-5-3

समजून घेणे तसेच या दोहोफ्लमधील असणारा संबंध जो धारणा, विश्वास, वेदन-संवेदन, बोधनिक क्रिया, अध्ययन क्रिया, सामाजिकीकरण यांनी प्रभावित होतो त्याचा सर्वांकष अभ्यास करणे. यातून निर्माण होणाऱ्या सिध्दातांना व्यवहारात लागू करणे. आजपर्यंत नेतृत्व, नेतृत्वकला, समूह व्यवस्थापन, समूहसंघर्ष, वर्णव्देषी वर्तन, मतदारांची भूमिका, मतदानाची प्रेरणा, परराष्ट्र धोरण निर्मिती, विविध योजनांचा विकास करणे अशा विविध क्षेत्रात राजकीय मानसशास्त्राच्या तत्वांना लागू करण्यात आलेले आहे.

**राजकीय मानसशास्त्राचा इतिहास:**

जसं हर्मन एबिंगहॉसने म्हटलं आहे की, मानसशास्त्राचा भूतकाळ खूप मोठा आहे पण इतिहास मात्र छोटा आहे. अगदी असंच राजकीय मानसशास्त्राचे आहे. या शाखेचा भूतकाळ मोठा आहे पण इतिहास छोटा आहे. मानसशास्त्रीय प्रक्रिया आणि राजकीय संघटन यांच्यातील संबंधाची पाळेमुळे अगदी ग्रीक तत्वज्ञानपर्यंत जातात. सॉक्रेटीस, प्लॅटो, ॲरिस्टटॉटल, ॲरिलियॅसिस इथपर्यंत ही कडी पोहचते. मध्यंतरीच्या काळानंतर अनेक चढउतार होत होत 19 व्या शतकात राजकीय मानसशास्त्राला सुग्गीचे दिवस आले. मॅकग्वायर (1993) यांनी राजकीय मानसशास्त्रीय कालखंडाचे तीन टप्पे केलेले आहेत. 1940 व 1950 चे दशक हे वर्तनवादी पॅथॉलॉजी संबंधित संशोधनाशी निगडीत होते. तसेच व्यक्तिमत्त्वावर राजकीय प्रक्रियांचा होणारा प्रभाव की जो वर्तनावाद व मनोविश्लेषनवादाने प्रेरित होता.

1960 आणि 1970 च्या दशकात संशोधकांचा रस राजकीय वृत्ती आणि मतदान या लोकांच्या वर्तनाकडे वळाला, ह्या संशोधनाचा भार हा प्रामुख्याने नवीन उपलब्ध सर्वेक्षण डेटा आणि सांख्यिकीय तंत्रांवर आधारित आहे., उदाहरणार्थ, अभिवृत्ती आणि मतदानाच्या वर्तनावर राजकीय मोहिमांचा प्रभाव तपासणे. 1980 आणि 1990 च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात राजकीय मानसशास्त्र हे क्षेत्र मुख्यत्वे राजकीय संज्ञानात्मकता आणि वैयक्तिक निर्णय घेण्यावर केंद्रित होते, ज्यामुळे इतर वर्तणुकीशी संबंधित शास्त्रांमध्येदेखील लक्षात येण्याजोगी संज्ञानात्मक प्रवृत्ती दिसून येते. नागरीकांना मर्यादित माहिती प्रक्रिया यंत्र म्हणून प्रस्तुत केले गेले जे विविध संज्ञानात्मक हेरिस्टिक्सवर आधारित चांगले निर्णय घेण्यास सक्षम होते. राजकीय मानसशास्त्राचे पहिले हँडबुक 1970 च्या दशकाच्या सुरुवातीस (Knutson, 1973) प्रकाशित झाले होते, त्याच काळात राजकीय मानसशास्त्राच्या शाखेला स्पष्टपणे समर्पित असलेली अनेक पाठ्यपुस्तके दिसून आली, ती सर्व स्पष्टपणे राजकीय मानसशास्त्राच्या संज्ञानात्मक दृष्टीकोनाने भरलेली आहेत (Iyyangar and McGuire, 1993; Lau and Sears, 1986).

1990 च्या दशकाच्या मध्यापासून राजकीय मानसशास्त्र हे क्षेत्र लक्षणीय वाढले आहे आणि ते अधिक

ISBN-978-81-970623-5-3

वैविध्यपूर्ण बनले आहे. यामध्ये आज, कोणताही एक दृष्टीकोन प्रबळ किंवा संपूर्ण क्षेत्र संघटित मानला जाऊ शकत नाही. नेत्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तिरेखेवरील 'शास्त्रीय' संशोधनाचे विषय, राजकीय वर्तनाचे सायकोडायनामिक स्पष्टीकरण, राजकीय निर्णय घेण्याचे संज्ञानात्मक दृष्टिकोन किंवा राजकीय प्रक्रियेतील पूर्वग्रह आणि वर्णद्वेषाचे विश्लेषण संशोधकांचे लक्ष वेधून घेत आहेत. गेल्या दोन दशकांमध्ये राजकीय मानसशास्त्राची भरभराट होत आहे आणि या प्रवृत्तीचे एक स्पष्ट लक्षण म्हणजे राजकीय मानसशास्त्राच्या शीर्षकाखाली प्रकाशित होणाऱ्या नवीन पुस्तकांची संख्या वाढणे, त्यात संपादित पुस्तकांचा समावेश आहे (Cottam et al., 2010, Borgida et al., 2009; Monroe, 2002), एक वाचक (Jost and Sidanius, 2004), and a handbook (Huddy et al., 2013; Sears et al., 2003). शिवाय, जैविक आणि सामाजिक प्रक्रियांच्या एकात्मतेकडे कल प्रतिबिंबित करून, न्यूरोलॉजिकल आणि अनुवांशिक मॉडेल्स (Marcus, 2012) सह राजकीय वर्तन वाढत्या प्रमाणात स्पष्ट केले जाते.

राजकीय मानसशास्त्राची खऱ्या अर्थाने सुरुवात झाली ती, पश्चिम युरोपीय देशांमध्ये. फ्रान्स-पर्शियन लढाई आणि सौशॉलिस्ट क्रांती यातून राजकीय मानसशास्त्राची औपचारिक सुरुवात झाली. राजकीय मानसशास्त्र ही संकल्पना सर्वप्रथम मानववंशशास्त्रज्ञ ॲडॉल्फ बॅस्टीयन यांनी आपल्या मॅन इन हिस्ट्री 1860 या पुस्तकात वापरल्याचे दिसून येते. इमेली बॉटमी 1835-1906 यानी इंग्लीश पिपल : ए स्टडी ऑफ देअर पॉलिटिकल सायकॉलॉजी आणि द अमेरिकन पीपल : इलेमेन्टस ऑफ देअर पॉलिटिकल सायकॉलॉजी या पुस्तकातून या संकल्पनेचा अधिक उहापोह केलेला दिसतो. रिसोओरिगीमेन्टो 1870, गेटॅनो मोस्का 1958-1914, पॅरॅटो 1828-1923 या इटलीतील विचारवंतानी राजकीय मानसशास्त्राचे संकल्पना अधिकच विस्तृत करण्याचा प्रयत्न केला.

राजकीय मानसशास्त्रावर विशेषत: सिग्मंड फ्राईड यांच्या मनोविश्लेषणवादाचा प्रभाव तत्कालीन काळात दिसून येतो. त्यांच्या टोटेम ॲन्ड टॅबू 1913 आणि ग्रुप सायकॉलॉजी ॲन्ड द ॲनेलेसिस ऑफ इगो 1923 या पुस्तकात मनोविश्लेषण व राजकारण यांचा गडद संबंध दाखवला आहे.

जर्मनी, अमेरिका, ब्रिटन या देशांमध्ये राजकीय मानसशास्त्राचे वारे जोरात वाहू लागले होते. ऑक्सफोर्ड व कॅंब्रिज या विश्वविद्यापीठात तर राजकीय मानसशास्त्रावर कोर्स घेतले जावू लागले. जसं की द सायन्स ऑफ द मॅन सायकॉलॉजिकल सोसायटी.

एकूणच राजकीय मानसशास्त्र ही संकल्पना व्यापक करण्यात अनेक सामाजिक मनोविश्लेषण वादी, वर्तनवादी मानसशास्त्रज्ञांनी व राजकीय विचारवंत तत्वज्ञांनी मोठा हातभार लावला होता. आजही ह्यामध्ये विविध विचारप्रणाली व राजकीय मतप्रवाह यांचा लोकांवर होणारा परिणाम विशेषतत्वाने अभ्यासला जात आहे.

ISBN-978-81-970623-5-3

**सामाजिक प्रभाव व राजकीय मानसशास्त्र:**

सामाजिक प्रभावाची संकल्पना सामाजिक मानसशास्त्रामधील एक महत्त्वाची संकल्पना आहे. राजकारणामध्ये लोकं काय करतात? आपल्या पक्षीय विचारधारेचा, योजनांचा, ध्येयधोरणांचा विविधांगांनी प्रभाव पाडून मतदाराला आकर्षित करतात. त्यानुसार मतदार आकर्षित होतो व संबंधित व्यक्तीला अथवा पक्षाला मत देण्यास प्रेरित होतो. मग इथं प्रश्न असा निर्माण होतो की, हा मतदान नेमका कसा आकर्षित होतो? त्याच्या मागचं मानसशास्त्र काय? हे सामाजिक प्रभावाच्या माध्यामातून आपल्याला समजावून घेता येईल. सामाजिक प्रभाव म्हणजे, एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या भावभावनांमध्ये, विचारांमध्ये अभिवृत्तीमध्ये आणि वर्तनामध्ये बदल घडवते. या प्रभावानुसार व्यक्ती जे वर्तन करते त्याला अनुवर्तन असं म्हणतात. हा सामाजिक प्रभाव होण्याला चार घटक प्रमुख कारणीभूत आहेत ते म्हणजे -

1. सामाजिक अनुपालन 2. अनुसारिता 3. आज्ञाधारकात 4.तीव्र प्रबोधन

अनुपालन म्हणजे एखाद्या व्यक्तीला विनंती करुन तिचे मत परिवर्तन केले जाते. आता थेट व्यक्तीला 'तू असंच केलंस पाहिजे ', 'तू हाच निर्णय घेतला पाहिजे ', तू असाच विचार कर ' असं सांगितलं तर ती काय कोणतीच व्यक्ती मानणार नाही. पण याऐवजी ' असं..असं केलंस तर तुझ यात हित आहे ', 'या मार्गानं गेलास तर अधिक फायदा होण्याची शक्यता आहे ' अशा भाषेत सांगितलं तर मत परिवर्तन होण्याची दाट शक्यता असते. 1970 च्या दक्षकात इंदिरा गांधी विरुध्द त्यांचं स्वपक्षीय विरोधात असताना एक घोषणा दिली होती, ती म्हणजे 'वो कहते है इंदिरा हटाव, मै कहती हूँ गरिबी हटाव.' अशाप्रकारे समाजावर गुणात्मकरित्या प्रभाव पाडला जातो.

अनुसारिता म्हणजे ज्या समाजात, समूहामध्ये आपण राहतो त्या समाज किंवा समूहाच्या नियम-नियमावलीप्रमाणे वागण्याचा आपल्यावर दबाव असतो. समाजातील इतर सदस्य काय करत आहेत, त्यांची विचारधारा काय आहे. त्यानुसार वागण्याचा प्रयत्न समाज करत असतो. जर असं आपण केलं नाही तर समाजातून बहिष्कार किंवा वाळीत टाकण्याची भीती असते. त्यामुळे जास्तीत जास्त समूहाबरोबर जाण्याचा लोकांचा कल असतो. याकडे राजकीय मानसशास्त्र विशेष लक्ष देते.

आज्ञाधारकता आणि तीव्र प्रबोधन हे लोकांवर प्रभाव पाडण्यातील सर्वात वरच्या स्तराच्या संकल्पना आहेत. ज्याचा परिणाम सर्वाधिक होण्याची शक्यता असते. एखाद्याला थेट आज्ञा देणे किंवा त्याच्यावर तीव्र प्रबोधनाचा अवलंब करणे यामुळे अभिवृत्ती व विचारसरणीत लवकरात लवकर बदल घडून येण्याची शक्यता असते. ही सामाजिक प्रभावाची संकल्पना अतिविस्मृत व व्यापक आहे. ज्यामध्ये कर्ट लेविन, सॉलोमन ॲश, झिंबार्डो, डार्ले व लाटाने यांचे संशोधन व प्रयोग विशेष गाजले आहेत.

ISBN-978-81-970623-5-3

**समारोप:**

एकंदरीत पाहता राजकीय मानसशास्त्र हे दिवसेंदिवस व्यापक होत चालले आहे. अनेक संशोधक, शास्त्रज्ञ व अभ्यासकांच्या विपुल योगदानामुळे राजकीय मानसशास्त्र ही शाखा समृद्ध झालेली आहे. विशेषकरून मानसशास्त्रात दिवसेंदिवस होत असलेली संशोधनं राजकीय मानसशास्त्रालाही पूरक ठरत आहेत. सामाजिक प्रभाव, सामाजिक दबाव, सामाजिक मानदंड, ग्रुप थिंक, ग्रुप कोहेशन इत्यादी संकल्पना राजकारण, मतदार व राजकीय भूमिका यांना समजून घेण्यासाठी विशेष उपयुक्त ठरत आहेत. गेल्या १०० वर्षात दशकपरत्वे बदलत गेलेल्या राजकीय मानसशास्त्राच्या विविधांगी संकल्पना व इतिहासाचा एक धावता आढावा प्रस्तुत लेखामध्ये घेण्याचा प्रयत्न संशोधकांनी केलेला आहे.

**संदर्भ:**


1. McGuire, W.J., 1993. The poly-psy relationship: three phases of a long affair. In: Iyengar, S., McGuire, W.J. (Eds.), Explorations in Political Psychology. Duke University Press, Durham, NC, pp. 9–35.
2. Knutson, J.N., 1973. Handbook of Political Psychology. Josey Bass, San Francisco
3. Iyengar, S., McGuire, W. (Eds.), 1993. Explorations in Political Psychology. Duke University Press, Durham, NC.
4. Lau, R.R., Sears, D. (Eds.), 1986. Political Cognition: The 19th Annual Carnegie Symposium on Cognition. Lawrence Erlbaum, Hillsdale, NJ.
5. Borgida, E., Federico, C.M., Sullivan, J.L. (Eds.), 2009. The Political Psychology of Democratic Citizenship. Oxford University Press, Oxford, UK.
6. Monroe, K.R., 2002. Political Psychology. Lawrence Erlbaum, Mahwah, NJ.
7. Cottam, M.L., Dietz-Uhler, B., Mastors, E., Preston, T., 2010. Introduction to Political Psychology, second ed. Psychology Press, New York.
8. Jost, J.T., Sidanius, J. (Eds.), 2004. Political Psychology: Key Readings. Psychology Press, London.

ISBN-978-81-970623-5-3

9. Huddy, L., 2013. From group identity to political cohesion and commitment. In: Huddy, L., Sears, D.O., Levy, J.S. (Eds.), Oxford Handbook of Political Psychology, second ed. Oxford University Press, Oxford, UK, pp. 737–773.
10. Sears, D.O., Huddy, L., Jervis, R. (Eds.), 2003. Oxford Handbook of Political Psychology. Oxford University Press, New York.
11. Marcus, G.E., 2012. Political Psychology: Neuroscience, Genetics, and Politics. Oxford University Press, Oxford, UK.
12. Rudmin, Floyd W. (2005). "G. B. Grundy's 1917 Proposal for Political Psychology: 'A Science Which Has Yet to Be Created'" (PDF). ISPP News. 16 (2): 6–7.
13. Wikipedia contributors. (n.d.). Political psychology. Wikipedia. https://en.wikipedia.org/ wiki/ Political_psychology
14. Political psychology. (n.d.). Political Science - iResearchNet. https://political-science .iresearchnet.com /political-psychology/